# जाहिरात

## मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन(स्मार्ट) प्रकल्प, पुणे प्रकल्पांतर्गत सहाय्यक अभियंत्यांची रिक्त पदे सेवा निवृत्त अभियंत्यांमधून भरण्याकरिता नामिकासूची तयार करण्यासाठी वैयक्तिक माहितीसह अर्ज मागविण्यात येत आहेत.

जागतिक बँक अर्थ सहाय्यित मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत विभागीय प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, ठाणे/नाशिक/कोल्हापुर/नागपुर येथील सहाय्यक अभियंता संवर्गातील पदे सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१७/१२/२०१६ मधील तरतूदीनुसार भरण्याकरीता बाबतची जाहिरात दि.२३/१२/२०२२ व दि. ३/३/२०२३ रोजी वृत्तपत्रात व प्रकल्पाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीस प्राप्त झालेला अल्प प्रतिसाद विचारात घेता, उक्त ४ पदे भरण्याकरीता अर्ज मागविण्याची मुदत दि. २८/४/२०२३ पर्यंत वाढविण्यात येत आहे.

इच्छुक/ पात्र सेवानिवृत्त अभियंत्यानी शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादीबाबतच्या स्वस्वाक्षरीत प्रमाणपत्रांसह विहित नमुन्यातील आपला अर्ज दि. २८/४/२०२३ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यत किंवा त्यापूर्वी खालील पत्त्यावर सादर करावेत. उमेदवारांनी Hard Copy मध्ये सादर केलेले अर्जच विचारात घेतले जातील. ई-मेल किंवा तत्सम व्दारे सादर केलेले Soft Copy मधील अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.

प्रस्तुत जाहिरातीतील पदासाठीची शैक्षणिक अर्हता, अनुभव, कामाचे स्वरूप, अर्जाचा विहित नमुना व अर्ज करण्याची पध्दती इ. बाबतची सविस्तर माहिती प्रकल्पाच्या https://smart-mh.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**अर्ज सादर करण्याचा पत्ता**

**प्रकल्प संचालक,**

मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प,
प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष,
शेती महामंडळ भवन,
२७०,भांबुर्डा, सेनापती बापट रोड,
पुणे ४११०१६.

स्वाक्षरीत/-
**(कौस्तुभ दिवेगावकर)**
प्रकल्प संचालक,
मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व
ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प